नि. फौ.ख.क्रं. १२०/२०२३
शासन वि. सुभाष व ३ इतर
नि.क्र. ३१/क

**सरकारतर्फे साक्षीदार क्रं.०१ यांची शपथेवर जबानी**

| | | |
|---|---|---|
| नाव | : | सारिका राजेश झांजे |
| वय | : | ३६ वर्षे |
| व्यवसाय | : | शेती |
| राहणार | : | वाहिरा ता. आष्टी जि. बीड |

**सरतपासणी अभियोगपक्षातर्फे सरकारी वकील श्री.व्ही.एस. गव्हाळे यांचेमार्फत**

०१. मी घरी पती, सासु–सासरे व दोन मुलांसोबत राहते. आरोपी क्र. १ ते ४ भावकीतील असल्याने त्यांना ओळखते. आरोपी क्र. १, ३ व ४ आज न्यायालयात हजर आहे. नि. ३० वरील आदेशाप्रमाणे आरोपी क्र. २ यांची ओळख न नाकारण्याच्या अटीसह हजेरीमाफी मंजुर. घटना दि. २३/१/२०२३ रोजी संध्याकाळी ६.३० वाजण्याच्या सुमारास अंगणात कपडे धुत असतांना तेथे आरोपी क्र. १ ते ४ आले. आरोपी क्र. २ संतोष हा माझा मुलगा रोहन झांजे यास म्हणाला की, तु माझ्या मुलास का मारले. मी संतोषला मुलांमध्ये भांडणे झाली असतील शिवीगाळ करु नका. माझे पती आरोपी क्र. २ ला म्हणाले की, माझ्या मुलाला समजावुन सांगतो, लहान मुलांमध्ये भांडणे झाली असतील. आरोपी क्र. १ सुभाष काठी घेऊन मारहाण करायला लागले. त्यांनी मला काठीने मांडीवर, पाठीवर, हातावर मारहाण केली. आरोपी क्र. २ ने माझ्या पतीस काठीने व लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. आरोपी क्र. ३ भाऊसाहेब याने माझी सासु गिरजाबाई हिला लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. रस्त्याने जाणारे श्रीकांत झांजे यांनी भांडणे सोडवली. त्यानंतर आम्ही अंभोरा पोलीस स्टेशनला गेलो. त्यांनी कडा येथे सरकारी दवाखान्यात जाण्यासाठी पत्र दिले. मी, पती, सासु, व मुलगा दवाखान्यात गेलो. मी व सासुने उपचार घेतले. मुलगा रोहन याने त्याच्या मोबाईलमध्ये जखमेचे फोटो काढले.

२. उपचार घेतल्यानंतर पुन्हा २५ तारखेला अंभोरा पोलीस स्टेशन येथे गेलो व आरोपींविरुध्द फिर्याद दिली. आता मला जबाब/फिर्याद दाखवण्यात आली. त्यातील मजकुर खरा

व बरोबर आहे त्यावर माझी सही आहे. फिर्यादीस **नि.पी–३२/पीडब्ल्यु–१** देण्यात येते. फिर्याद दिल्यानंतर पोलीस माझ्या घरी पंचनाम्यासाठी आले. मी पोलीसांनी घटनास्थळ दाखवले. मुलाने काढलेले फोटो दाखवल्यास ओळखु शकते. नि. ३५ वर फिर्यादीतर्फे जखमीबाबत फोटो दाखल करण्याबाबत अर्ज देण्यात आला. आरोपीतर्फे विधीज्ञांनी पोलीसांमार्फत दोषारोप दाखल केल्यानंतर साक्षीदारामार्फत इतर पुरावा देता येणार नाही असा आक्षेप नोंदवला. अभियोगपक्षाने युक्तीवाद केला की, सदर फोटो हे प्रकरण गुणदोषावर निर्णय देण्यासाठी व त्याबाबत पुरावा येण्यासाठी आवश्यक असुन अर्ज मंजुर करण्याची विनंती केली. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद लक्षात घेतला. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या ***समीर संधीर वि. सी.बी.आय.–२०२५*** या न्यायनिवाड्यानुसार अभियोगपक्ष अतिरिक्त कागदपत्रे पुराव्यादरम्यान नियमाप्रमाणे सिध्द करण्याच्या अटीवर दाखल करु शकते. सबब, आक्षेप नामंजुर.

३. साक्षीदारास नि. ३६ वरील फोटो दाखवण्यात आले. सदर एकुण ८ फोटोस ओळखीकामी एकत्रित **आर्टीकल अ** देण्यात येते. सदर फोटोमध्ये मी, सासु दिसत असुन मला झालेल्या जखमा दिसत आहे. आरोपीने ज्या काठीने मारले ती पाहिल्यास ओळखु शकते. साक्षीदारास मुद्देमाल जी.एम.पी. ४०/२०२५ बांबुची काठी दाखवण्यात आली. साक्षीदाराने काठी तीच असल्याचे ओळखले. मुद्देमालास नि. **एम.ओ. १** देण्यात येते.

**सरतपास पुर्ण**

**आरोपी क्र. १ ते ४ तर्फे विधीज्ञ श्री. बी.एम. झांबरे यांच्यातर्फे उलटतपास सुरु.**

४. माझे ७ वी पर्यंत शिक्षण झाले आहे. साक्षीदार यादीतील साक्षीदार क्र. ३ ते ८ भावकीतील आहेत. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी व आमची वस्ती शेजारी– शेजारी आहे. आमच्या वस्तीच्या दोन्ही बाजुने आरोपींची वस्ती आहे. आमच्या वस्तीपासुन जि.प. शाळा जवळच आहे. आमच्या वस्तीच्या पुर्वेला चिटकुट नावाची ५–५० लोकांची वस्ती, दक्षिणेस झांजे वकीलांची ५–५० लोकांची वस्ती आहे. आमच्या वस्तीच्या उत्तरेस सालई नावाची ५–५० लोकांची वस्ती आहे. घटना घडल्यानंतर अगोदर पोलीस स्टेशनला संध्याकाळी ८.०० वाजता गेलो. पोलीसांनी पत्र दिल्यानंतर कडा येथे सरकारी दवाखान्यात गेले. त्यानंतर दवाखान्यातुन घरी गेले. फिर्याद

देईपर्यंत मी घरी होते. दवाखान्यातुन पोलीस स्टेशनला गेले नाही. वाहिरा ते अंभोरा, कडा ते अंभोरा, वाहिरा ते कडा चे अंतर सांगता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, दवाखान्यात डॉक्टरांनी अॅडमीट करुन घेतले नाही. अमान्य की, दवाखान्यात स्वतःच्या गाडीवर गेलो. दोन दुसऱ्यांची गाडी केली होती. त्याबाबत फिर्यादमध्ये नमुद केले नाही. अमान्य की, मारहाण झाल्यानंतर कडा येथे दवाखान्यात गेलो नाही. माझी माझ्या पतीसोबत चर्चा झाली नाही. दवाखान्यातुन घरी जातांना पती सोबत होते. घरी असतांना देखील पती सोबत होते.

५. आम्ही शेती करतो. घरातील अंगण झाडणे, स्वयंपाक करणे व इतर कामे मी करते. सदर कामे सकाळी १०–१२ वाजेपर्यंत उरकतात. अमान्य की, दिवसभर काही काम नसते. मुलगा रोहन शाळेत सकाळी १० ते –५.०० जातो. माझे पती गाडीवर कामाला आहेत. ते सकाळी गेल्यावर संध्याकाळी घरी येतात. माझे पती पांडुळे यांच्या खडीचे टिप्पर गाडीवर कामाला होते. गावापासुन आमची वस्ती २ कि.मी. अंतरावर आहे. मारहाणीची घटना ३० मिनीटे चालली. घरासमोरील रस्ता वाहिरा गावाकडे जातो. हे म्हणणे खरे आहे की, सदर रस्त्यावर लोकांची वर्दळ असते. घटनेच्या दिवशी ७–८ वाजता शेख मोहम्मद बाबा यांच्या घोड्याचा वाढदिवस होता. हे म्हणणे खरे आहे की, गावातील लोक तिकडे जात होते व तेथे जमले होते. आम्ही त्या कार्यक्रमाला गेलो नाही. हे म्हणणे खरे आहे की, आमची व आरोपींची जमीन शेजारी–शेजारी आहे. हे म्हणणे खरे आहे की, साक्षीदार श्रीकांत झांजे यांची वस्ती आमच्या वस्तीपासुन १०००–१५०० फुटावर उत्तरेस आहे. त्याच्या घराजवळ फक्कड झांजे, मिनीनाथ झांजे, भाऊसाहेब झांजे, तुकाराम झांजे, सिताराम झांजे, अशोक झांजे, रामविश्वनाथ यांच्या वस्त्या आहेत.

६. आमच्या कांद्याची लोखंडी चाळ असुन त्याला लोखंडी खांब आहेत, त्याला आडवे–उभे बांबु आहेत. घराजवळ बांबुचे बेटाचे बांबु चाळीला लावले आहेत. फक्कड झांजे, भास्कर झांजे, बबन झांजे, बळीराम झांजे व आरोपी सुभाष झांजे यांना ओळखते. दादासाहेब रंगनाथला ओळखत नाही. अमान्य की, नमुद लोकांशी आमची कुरबुर/किरकोळ वाद झाली आहे. अमान्य की, आरोपी संजय याने झालेले वाद बऱ्याच वेळा मिटवले आहेत. पंचाना आम्ही बोलावले होते. आम्ही पोलीसांना भांडणामध्ये रक्त लागलेले कपडे दिले होते परंतु पोलीसांनी ते कपडे घेतले नाही. हे

म्हणणे खरे आहे की, आरोपीसोबत आमचे नेहमी बांधावरुन वाद होतात. पोलीसांना जबाब देतांना, मी आरोपी क्र. २ संतोषने काठीने मारले, सुभाषने मांडीवर व पाठीवर मारले, पती त्यानंतर आले, आरोपी क्र. २ संतोषने माझ्या मुलाला विचारले, हा मजकुर पोलीसांना फिर्याद देतेवेळी सांगितला होते परंतु  तसा मजकुर माझ्या जबाबमध्ये का नमुद नाही याचे कारण सांगता येत नाही.

**मध्यान्हाची वेळ झाल्याने उर्वरित उलटतपास दुपारपर्यंत तहकुब–**

दि.३१.०१.२०२६

श्रवणोत्तर स्वीकृती

MAHESH RAMCHANDRA BADAKH

Digitally signed by MAHESH RAMCHANDRA BADAKH
Date: 2026.02.02 11:05:07 +0530

श्री. एम. आर.बडाख

न्यायदंडाधिकारी प्रथमश्रेणी, न्यायालय क्रं.३ आष्टी

**दुपारनंतर उर्वरित उलटतपास आरोपी क्र. १ ते ४ तर्फे विधीज्ञ बी.एम. झांबरे यांच्यामार्फत शपथेवर सुरु.**

७. आरोपी क्र. ४ संजय शिवराम झांजे ग्रामपंचायतच्या निवडणुकीसाठी उभे असलेबाबत माहिती नाही. मतदानासाठी मी जाते. निवडकुबाबत माहिती आहे. आरोपी भावकीतील आहेत. आरोपी क्र. ४ धानोरा येथे नोकरीस आहेत. आरोपी क्र. १ व २ वेगवेगळे राहत असलेबाबत माहिती नाही. घटनेच्या वेळी आजुबाजुचे ५–६ लोक जमले असावेत. त्यांची नावे सांगता येत नाही. ते ओळखीचे वस्तीवरील होते. शेख महंमद च्या उत्सवाच्या तिथीबाबत सांगता येत नाही. वर्षातुन किती वेळा उत्सव होतो हे देखील सांगता येत नाही. पोलीस स्टेशनवरुन आल्यानंतर पोलीसांची गाठभेट झाली नाही. अमान्य की, आम्ही घरात बसुन घटनेबाबत कोणी काय काय केले असे ठरवुन चर्चा केली व त्यानंतर फिर्याद दिली. अमान्य की, मुलगा रोहन याने ५.३० वाजण्याच्या सुमारास माझ्या पतीस फोन करुन बोलावले व ते चिटकुट वस्तीवर गेले. अमान्य की, चिटकुट वस्तीवर शेतात माझी सासु काम करत होती. अमान्य की, मुलगा रोहन याने आरोपी क्र. १ ला वीट फेकुन मारली व त्याच्या नाकाला लागले. वीट मारल्याच्या घटनेबाबत पतीने माझ्याशी चर्चा केली नाही. हाणमार केल्यामुळे आरोपी क्र.१ दवाखान्यात गेलेबाबत माहिती नाही. पोलीसांकडुन त्याबाबत कळाले नाही.

८. माझ्याकडे स्मार्टफोन नाही. साक्षीदारास मुद्देमाल दाखवला. अमान्य की, मुद्देमाल

काठी आमच्या लिंबाच्या बागेतील बांबुच्या बेटाची तोडुन दिली. अमान्य की, आरोपी क्र. १ ते ४ २३ तारखेला आमच्याकडे आले नाही व मारहाण केली नाही. अमान्य की, मारहाणीमुळे जखमा झाल्याचे खोटे सांगत आहे. अमान्य की, जखमा झाल्यामुळे दवाखान्यात गेल्याचे खोटे सांगत आहे. अमान्य की, नि. ३६ वरील फोटो पोलीसांना दिले नाही. अमान्य की, सरतपासातील नमुद केलेला मजकुर खोटा सांगितला आहे. अमान्य की, भावकीच्या बांधाच्या वादातुन आरोपींविरुध्द खोटी केस केली. अमान्य की, खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण**

**फेरतपास नाही.**

दि.३१.०१.२०२६

श्रवणोत्तर स्वीकृती

MAHESH RAMCHANDRA BADAKH

Digitally signed by MAHESH RAMCHANDRA BADAKH
Date: 2026.02.02 11:05:14 +0530

श्री. एम. आर.बडाख

न्यायदंडाधिकारी प्रथमश्रेणी, न्यायालय क्रं.३ आष्टी